दिव्य मराठी
सोलापूर सिटी 09-10-2024

सिटी न्यूज

# सायबर सुरक्षेबाबत जनजागृती उपक्रम

सोलापूर| नवशक्ती नवरात्री महोत्सव मंडळ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी सोलापूर विद्यापीठ आणि क्विक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनींसाठी ''''सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा\' कार्यक्रम राबवण्यात आला. विद्यापीठातील संगणक शास्त्र संकुलातील कांचन निकंबे, सई आवताडे या विद्यार्थ्यांनी \'सायबर सुरक्षा\' या विषयावर मार्गदर्शन केले. सध्याच्या ऑनलाइन युगामध्ये होणाऱ्या विविध प्रकारच्या फसवणुकीबद्दल उदाहरणाद्वारे कांचन यांनी माहिती दिली. अश्या प्रकारच्या फसवणुक होऊ नये म्हणून त्याबद्दल सर्वांनी काळजी घेण्याविषयी सविस्तर माहिती आवताडे यांनी दिली.

'ओ. टी. पी.' कोणास सांगू नये, अनोळखी नंबर वरून आलेले फोन नंबरची पडताळणी करून घेणे, व्हाट्सअप व इतर सोशल मीडियावर आलेल्या मेसेजेस व लिंकची शहानिशा करावी व त्यानंतरच पुढील प्रक्रिया करावी अशी माहिती सई अवताडे यांनी दिली. विविध ॲप्स डाऊनलोड करताना परमिशन चेक करणे व अनावश्यक परमिशन काढून घेणे, मोबाईल मधल्या महत्त्वाच्या सेटिंग्ज कांचन निकंबे यांनी सांगितल्या. सोशल मीडिया अकाउंटला टू फॅक्टर ऑथेंटिकेशन लागू करणे, व मजबूत पासवर्ड कसा असावा या बाबत सई अवताडे यांनी मार्गदर्शन केले.

विविध महत्त्वाच्या सायबर गुन्ह्यांची प्रकार सांगून त्यावर काय उपाययोजना करणे हे देखील विद्यार्थ्यांनी सांगितले. या कार्यक्रमास नवशक्ती नवरात्र मंडळाचे अंबादास शेळके व इतर सदस्य उपस्थित होते. कांचन निकंबे यांनी सर्वांचे आभार मानले.